# MAHARASHTRA ACT No. XI OF 1972

## THE MAHARASHTRA TEMPORARY INCREASE IN TAXES ON MOTOR VEHICLES AND PASSENGERS ACT, 1972

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २७ एप्रिल १९७२ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XI OF 1972

## AN ACT TO PROVIDE FOR A TEMPORARY INCREASE IN TAXES ON MOTOR VEHICLES, AND IN TAXES ON PASSENGERS CARRIED BY ROAD IN STAGE CARRIAGES

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक २९ एप्रिल १९७२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.

**मोटार वाहनांवरील करांमध्ये, आणि टप्पा वाहनांद्वारे रस्त्यावरून नेण्यात येणाऱ्या उतारूंवरील करांमध्ये तात्पुरती वाढ करण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** मोटार वाहनांवरील करांमध्ये, आणि टप्पा वाहनांद्वारे रस्त्यावरून नेण्यात येणाऱ्या उतारूंवरील करांमध्ये तात्पुरती वाढ करण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि मुदत.**

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मोटार वाहने आणि उतारू यांवरील करांमध्ये तात्पुरती वाढ करण्याबाबत अधिनियम, १९७२ असे म्हणता येईल.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, २ डिसेंबर १९७१ रोजी अमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(४) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेपासून तो अंमलात असण्याचे बंद होईल; आणि मुंबई सामान्य परिभाषा अधिनियम, १९०४ याच्या कलम ७ चे उपबंध, हा अधिनियम अंमलात असण्याचे बंद झाल्यावर जणू महाराष्ट्र अधिनियमाद्वारे तो त्यावेळी रद्द करण्यात आला असल्याप्रमाणे लागू होतील.

व्याख्या. २. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) ज्या क्षेत्रात असा अधिनियम अंमलात असेल त्या क्षेत्राच्या संबंधात "संबंधित मुख्य अधिनियम'' म्हणजे,—

(१) मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ ; किंवा

(२) मुंबई मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी) अधिनियम, १९५८ ;

(ब) या अधिनियमात वापरण्यात आलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्दप्रयोगांना संबंधित मुख्य अधिनियमांमध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून देण्यात आले असतील तेच त्यांचे अर्थ असतील.

मोटार वाहनांवरील करांमध्ये तात्पुरती वाढ. ३. (१) मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, १ ऑक्टोबर १९७१ रोजी आणि त्या दिवसापासून त्या अधिनियमाच्या कलम ३ अन्वये बसविण्यात आलेल्या आणि वसूल करण्यात आलेल्या कराव्यतिरिक्त, उक्त कलम ३ अन्वये, अशा मोटार वाहनांच्या संबंधात, राज्य शासनाकडून निश्चित करण्यात आलेल्या दराच्या दहा टक्के दराने मोटार वाहनांवर कर बसविण्यात येईल आणि वसूल करण्यात येईल.

स्पष्टीकरण.—या कलमातील "मोटार वाहने" म्हणजे, राज्यामध्ये वापरण्यात आलेली किंवा वापरासाठी ठेवण्यात आलेली मोटार वाहने आणि—

(एक) मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ याच्या पहिल्या अनुसूचीचा विभाग एक, उप-विभाग अ, खंड एक आणि सहा यांमध्ये ;

(दोन) त्या अधिनियमाच्या पहिल्या अनुसूचीच्या विभाग दोनमध्ये ;

विनिर्दिष्ट केलेली परंतु या स्पष्टीकरणाच्या खंड (एक) च्या कक्षेत येणारी मोटार वाहने :

परंतु त्यामध्ये, उक्त अधिनियमाच्या कलम १३ द्वारे किंवा तदन्वये ज्यांना सूट दिली असेल अशा कोणत्याही वाहनांचा समावेश होणार नाही.

(२) मुंबई मोटार वाहने कर अधिनियम, १९५८ यातील कलम ३ संबंधीचे सर्व निर्देश हे, अधिनियमाच्या कलम ३ आणि त्याच्या उपबंधांसंबंधीचे निर्देश असल्याच मानण्यात येईल.

टप्पा वाहनांद्वारे रस्त्यावरून वाहतूक करण्यात येणाऱ्या उतारूंवरील करांमध्ये तात्पुरती वाढ. ४. (१) मुंबई मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी) अधिनियम, १९५८ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी १५ डिसेंबर १९७१ रोजी आणि त्या दिवसापासून, उक्त अधिनियमाच्या कलम ३ अन्वये राज्य शासनाकडून बसविण्यात आलेल्या आणि राज्य शासनाकडे भरणा करण्यात आलेल्या कराव्यतिरिक्त, पुढील क्षेत्रात वाहतूक करणाऱ्या टप्पा वाहनांद्वारे रस्त्यावरून नेण्यात येणाऱ्या सर्व उतारूंवर पुढीलप्रमाणे जादा कर बसविण्यात येईल व त्याचा राज्य शासनाकडे भरणा करण्यात येईल :—

(अ) कोणत्याही नगरपालिका क्षेत्रातच केवळ किंवा राज्य शासनाकडून शासकीय राजपत्रात अधिसूचित करण्यात आलेल्या मार्गावरच केवळ वाहतूक करणाऱ्या टप्पा वाहनांवरील उतारूंवर, याद्वारे बसविण्यात आलेला जादा कर वगळता, केलेल्या प्रवासाचे भाडे पंचचाळीस पैसे किंवा त्याहून अधिक असेल त्या बाबतीत, पाच पैसे या दराने ;

(ब) राज्याच्या इतर क्षेत्रात, याद्वारे बसविण्यात आलेला जादा कर वगळता, केलेल्या प्रवासाचे भाडे एक रुपयापेक्षा अधिक असेल त्या बाबतीत, पाच पैसे या दराने.

स्पष्टीकरण.—"टप्पा वाहनातून रस्त्यावरून वाहून नेण्यात येणारे उतारू" या शब्दप्रयोगात टप्पा वाहनांद्वारे रस्त्यावरून विनामूल्य किंवा प्रवर्तकाकडून देण्यात आलेल्या कोणत्याही सवलतीच्या

तिकिटाच्या प्राधिकारावर ज्यांची वाहतूक करण्यात येईल किंवा मुंबई मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी) अधिनियम, १९५८ याच्या कलम २१ अन्वये ज्यांना माफी देण्यात आली असेल असे उतारू किंवा आंतर-राज्य मार्गावर टप्पा वाहनांमधून ज्यांची वाहतूक करण्यात येईल असे उतारू यांचा समावेश होणार नाही.

(२) मुंबई मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी) अधिनियम, १९५८ याच्या कलम ३ मधील सर्व निर्देश हे या अधिनियमाचे कलम ३ आणि त्याचे उपबंध यांसंबंधीचे निर्देश असल्याचे मानण्यात येईल.

**अन्यथा उपबंधित करण्यात येईल त्याव्यतिरिक्त संबंधित मुख्य अधिनियमाचे उपबंध लागू असणे.**

५. या अधिनियमात अन्यथा उपबंधित करण्यात येईल त्याव्यतिरिक्त, संबंधित मुख्य अधिनियमाचे सर्व उपबंध हे, अशा संबंधित मुख्य अधिनियमान्वये कर बसविणे आणि तो वसूल करणे या बाबतीत ज्या रीतीने लागू होत असतील त्याच रीतीने, ते या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये कर बसविणे आणि ते वसूल करणे या बाबतीत लागू होतील.

**व्यावृत्ति.**

६. या अधिनियमातील कोणत्याही मजकुरामुळे, कोणत्याही व्यक्तीस, तिने या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेली कोणतीही कृती किंवा करावयाची वर्जिलेली कृती ही, या अधिनियमाच्या उपबंधांच्या अभावी, संबंधित मुख्य अधिनियमान्वये अपराध ठरणार नसेल तर, दोषी ठरविण्यात येणार नाही; किंवा अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अमलात असलेल्या कोणत्याही विधि-अन्वये कोणत्याही व्यक्तीला जी शिक्षा देण्यात आली असती त्यापेक्षा अधिक शिक्षा त्या व्यक्तीला अशा कृतीबद्दल किंवा करण्याचे वर्जिलेल्या कृतीबद्दल दिली जाणार नाही.

**सन १९७१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक आठ रद्द करणे व व्यावृत्ति.**

७. (१) महाराष्ट्र मोटार वाहने आणि उतारू यांवरील करांमध्ये तात्पुरती वाढ करण्याबाबत अध्यादेश, १९७१ हा, याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

(२) अध्यादेश अशा रीतीने रद्द करण्यात आला असला तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कारवाई ही, या अधिनियमान्वये केलेली गोष्ट किंवा केलेली कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

**के.मा. अराध्ये**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.